**महाराष्ट्र शासन**

**कृषि विभाग**

# मुंग पिकातील एकात्मिक पिक व्यवस्थापन

वाशिम जिल्ह्यात मुंग पिका खालिल क्षेत्र ६३९० हेक्टर असुन, या पिकाचे क्षेत्र दिवसेंदिवस कमी होत आहे. या पिकाखालिल क्षेत्र कमी होण्याचे प्रमुख कारण मृग नक्षत्रात पेरणी योग्य पाऊस न पडणे. पेरणीची वेळ निघुन गेल्यामुळे अपेक्षीत उत्पादनावर परीणाम होतो. पिक फुलोरा व दाणे भरण्याचे अवस्थेत असतांना पावसाचा खंड पडल्यास फुले गळुन पडतात आणि शेंगा पक्व होत नाहीत, त्यामुळे सुध्दा पिकाच्या उत्पादनावर मोठा परिणाम होतो. परीपक्व झाल्यानंतर शेंगा तोडणीकरीता वेळेवर मजुर न मिळाल्यामुळे पिक पावसात सापडुन पिकाचे नुकसान होते. जिल्हयात कारंजा व मानोरा तालुक्यात कपाशी + मुंग १:१ या प्रमाणात सुध्दा पेरणी केली जाते व हे पिक व्दिदल असल्यामुळे जमीनीचा पोत सुधारण्यास मदत होते.

| अ क्र | बाब | निविष्ठा / तंत्रज्ञान |
|---|---|---|
| १ | सुधारीत वाण | ➢ **आधिक उत्पादनासाठी सुधारित वाणाचे निवड करीत असतांना विद्यापिठाकडुन प्रसारीत झालेले वाण निवडावे.**<br>➢ **मुंग पी.के.व्ही ८८०२** – (सन २०००) कालावधी ६१ ते ६३ दिवस, उत्पादन ४ ते ५ क्विंटल/एकर,लवकर व एकाच वेळी परीपक्व होणारा, भुरी रोगास मध्यम प्रतिकारक्षम.<br>➢ **पी.के.व्ही ग्रिन गोल्ड (ए.के.एम९९११)** – (सन २००७) कालावधी ६४ ते ७२ दिवस, उत्पादन ४ ते ५ क्विंटल/एकर, मध्यम जाड दाणे, भुरी रोगास मध्यम प्रतिकारक्षम.<br>➢ **पी.के.व्ही ए.के.एम-४** – (सन २००९) कालावधी ६५ ते ७० दिवस, उत्पादन ४ ते ५ क्विंटल/एकर , जाड दाणे ,अधिक उत्पादन देणारा वाण, खरीप व उन्हाळी दोन्ही हंगामा करीता उपयुक्त.<br>➢ **टी. आर. एम. १८** – (सन १९९४) कालावधी ६८ ते ७० दिवस, उत्पादन ४ ते ५ क्विंटल/एकर , भुरी रोगास प्रतिकारक ,अधिक उत्पादन देणारा वाण. |

| | | |
|---|---|---|
| | | ➢ टी. आर. एम. २ – (सन १९९०) कालावधी ६८ ते ७० दिवस, उत्पादन ४ ते ५ क्विंटल/एकर , भुरी रोगास प्रतिकारक ,पुर्व विदर्भात रब्बी लागवडीकरीता.<br>➢ बी. पी. एम. आर १४५ – (सन २००१) , कालावधी ६५ ते ७० दिवस, उत्पादन ४ ते ५ क्विंटल/एकर ,<br>➢ मुंग कोपरगाव – (सन १९८२) कालावधी ६० ते ६५ दिवस, उत्पादन २.५ ते ३ क्विंटल/एकर , टपोरे दाणे,भुरी तसेच करपा रोगास बळी पडणारा. |
| २ | बियाणे | ➢ ६ किलो/एकर |
| ३ | बिजप्रक्रिया | पहीली: २.५ ग्रॅम बावीस्टीन/किलो बियाणे<br>दुसरी: पेरणी पुर्वी /किलो बियाण्यास ५ ग्रॅम ट्रायकोडर्मा पावडर लावावी व त्यानंतर २५ ग्रॅम रायझोबियम जीवाणुची पावडर गुळाच्या थंड पाण्यामध्ये मिसळुन लावावी. |
| ४ | लागवडीचे अंतर | ➢ ४५x५ से.मी. किंवा ३०x१० से.मी. जमीनीचे मगदुरानुसार |
| ५ | पेरणीची वेळ | ➢ मान्सुनचा पहीला पेरणी योग्य पाऊस होताच किंवा जुनच्या दुस-या पंधरवाडयात पेरणी पुर्ण करावी. |
| ७ | खत व्यवस्थापन प्रति एकर | ➢ मशागतीनंतर ८ बैलगाडया चांगले कुजलेले शेणखताचा भर खते म्हणुन वापर करावा.<br>➢ रासायणीक खत २५:५०:२५ किलो नत्र : स्फुरद : पालाश / हेक्टरी वापर करावा ( डी.ए.पी. ५० किलो+ म्युरेट ऑफ पोटॅश २०किलो/एकरी) |
| ८ | सुक्ष्म मुलद्रव्ये प्रति एकर | ➢ झिंक सल्फेट – ६ किलो / एकर |
| ९ | तण व्यवस्थापन (तणनाशक) | ➢ पिक पेरणी झाल्यानंतर २४ तासाच्या आत पेंडामिथॅलीन ३० ते ३५ मिली १० लिटर पाण्यात घेऊन जमीनीवर फवारले असता बियाण्यापासुन वर येणा-या तणाचे नियंत्रण होते. |
| १० | आंतर मशागत | ➢ पहीली : पहीली डवरणी पेरणीनंतर २० दिवसांनी करावी.<br>➢ दुसरी : दुसरी डवरणी पेरणीनंतर ३० ते ३५ दिवसांनी करावी.<br>➢ तिसरी : तणाच्या प्रादुर्भावाचे प्रमाण पाहुन एखादी खुरपणी करावी. |

| | | |
|---|---|---|
| ११ | पाणी व्यवस्थापन | ➢ पावसाचा ताण पडला असता अशावेळी किंवा पिकाच्या वाढीच्या अवस्थेत, फुलोरा अवस्थेत आणी शेंगा भरण्याचे अवस्थेत उपलब्ध असलेल्या तुषार संचाद्वारे पाणी दयावे. |
| १२ | मुलस्थानी जलसंधारण | ➢ शेवटच्या डवरणीच्या वेळी भरी देतांना डव-याच्या दात्यास दोरी किंवा पोते बांधुन उथळ स-या पाडण्यात याव्यात. |
| १३ | पावसाचा ताण पडल्यास | ➢ पावसाचा ताण पडल्यास पोटॅशियम नायट्रेट ( १३:००:४५) १०० ग्रॅम/ १०लिटर पाण्यात घेऊन पिकावर फवारणी करावी. |
| १४ | पिक संरक्षण | ➢ पहीली : रस शोषणा-या किडी व भुरी रोगाचा प्रादुर्भावाची लक्षणे दिसुन येताच नियंत्रणासाठी पहिली फवारणी डायमिथोट (रोगर) २० मिली + पाण्यात मिसळणारे गंधक २५ ग्रॅम / १० लिटर पाण्यात घेऊन फवारावे.<br>➢ दुसरी : पहील्या फवारणीनंतर १२ ते १५ दिवसांनी दुसरी फवारणी डायमिथोट (रोगर) १५ मिली + बावीस्टीन १० ग्रॅम / १० लिटर पाण्यात घेऊन फवारावे. |
| १५ | काढणी व मळणी | ➢ शेंगा परीपक्व झाल्यानंतर लगेच पावसाचा अंदाज बघुन मजुराकडुन शेंगाची तोडणी करुन घ्यावी योग्य ठिकाणी सुकवुन त्याची मळणी करावी. |
| १६ | उत्पादन | ➢ पिकाचे उत्पादन ४ ते ५ क्विंटल /एकर. |








**प्रकल्प संचालक, आत्मा तथा**

**जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, वाशिम**

**( नविन प्रशासकीय इमारत, दुसरा मजला रुम नं. २०९, २१०,२११,२१२ )**

**फोन नं ०७२५२ – २३५८१३**

**ईमेल- dsaowashim@gmail.com**

# जमिनीचे आरोग्य व्यवस्थापन

